Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. ३० जून २०२६ । वर्ष १ । अंक ८३ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

गावठी कट्ट्यासह २४ वर्षीय तरुण जेरबंद!
(पान २ वर)



## » Selected

### पेपरफुटी आग्र्यातील छापखान्यातून

ठाणे : शिक्षक पात्रता परीक्षेची (टीईटी) प्रश्नपत्रिका उत्तर प्रदेशच्या आग्र्यातील मुद्रणालयातून प्रसारित झाल्याचा संशय विशेष तपास पथकाने व्यक्त केला आहे. या मुद्रणालयातच स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचीही छपाई होते. त्यामुळे 'टीईटी' पेपरफुटीच्या तपासातून मोठे जाळे उघडकीस येण्याची शक्यता तपास पथकाने व्यक्त केली. या मुद्रणालयातून प्रश्नपत्रिका 'फुटली'का, कशी फुटली, याचा छडा लावण्यात येत आहे. दरम्यान, पेपरफुटी प्रकरणाचा मुख्य सूत्रधार बिहारमधील पाटणा येथील असल्याचे पोलिसांनी सांगितले. विजयेंद्र कुमार ऊर्फ विजेंद्र गुप्ता हा या पेपरफुटी प्रकरणाचा सूत्रधार असल्याचे तपासात स्पष्ट झाले. गुप्ताच्याच माध्यमातून प्रश्नपत्रिकेची छापील प्रत अटकेत असलेल्या आरोपींपर्यंत पोहोचली. पेपरफुटीचे मूळ शोधण्याचे विशेष तपास पथकाचे प्रयत्न असून त्याआधारे या गैरव्यवहाराची साखळी उघडकीस आणली जाणार आहे.

### शिर्डीतील कार्यकर्ता मेळाव्यात उद्धव ठाकरेंचे आत्मपरीक्षण, शिंदे गट-भाजपवरही जोरदार टीका

# 'खाऊसाहेब' म्हणत ठाकरेंचा फुटीर खासदारांवर हल्लाबोल

## "चूक माझीच होती, पण | शिवसैनिक आणि शेतकरी आजही सोबत असल्याचा दावा

**जन सम्राट टाईम्स**

**शिर्डी । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिर्डी येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात शिंदे गट, भाजप आणि पक्ष सोडून गेलेल्या खासदारांवर जोरदार हल्लाबोल केला. आपल्या भाषणात त्यांनी फुटीर खासदारांना "खाऊसाहेब" म्हणत उपरोधिक टोले लगावले, तर भाजपच्या नेतृत्वावरही निशाणा साधत राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींवर परखड भाष्य केले.**

त्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.उद्धव ठाकरे म्हणाले की, सत्तेसाठी विचारधारा आणि निष्ठा बाजूला ठेवणाऱ्यांना जनतेसमोर उत्तर द्यावेच लागेल. पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांनी आज काहीही भूमिका घेतली असली, तरी जनतेला सत्य माहिती आहे. शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून ती लाखो शिवसैनिकांच्या त्यागातून उभी राहिलेली चळवळ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाजप आणि शिंदे गटावर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, उद्या पंतप्रधानपदाच्या निवडीची वेळ आली, तर शिंदे गटाने अमित



शाह यांनाच पाठिंबा द्यावा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपला नऊ खासदार निवडून आले, तर शिंदे गटाकडे आता तेरा खासदार असल्याचा उल्लेख करत त्यांनी सध्याच्या राजकीय समीकरणांवर उपरोधिक भाष्य केले. पक्ष सोडून गेलेल्या खासदारांवर टीका करताना त्यांनी काही खासदार आपण उद्धव ठाकरेंबद्दल बोलणार नसल्याचे सांगत असले, तरी जनतेसमोर त्यांना उत्तर द्यावेच लागेल, असे म्हटले. एका फुटीर खासदाराचा अप्रत्यक्ष उल्लेख करत ते म्हणाले की, तो कार्यकर्ता किंवा पक्षाच्या विचारांसाठी कधीच आला नव्हता. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीच त्याने शिवसेनेत प्रवेश केला होता आणि संधी मिळताच त्याने पक्षाशी बेईमानी केली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आत्मपरीक्षण करत स्वतःची चूकही मान्य केली. "ही माझीच चूक आहे. या खासदारांची खरी मानसिकता मला आधी समजली नाही. २०१४ पासूनच त्यांच्या राजकीय हालचाली सुरू होत्या, पण त्यावेळी त्यांच्यावर विश्वास ठेवला. आज त्या चुकीची कबुली देण्यात मला कोणताही कमीपणा वाटत नाही," असे ते म्हणाले. मात्र, पक्ष सोडून गेलेल्या लोकांपेक्षा सामान्य शिवसैनिक आणि शेतकरी हेच शिवसेनेचे खरे बळ असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. "खासदार गेले, पदाधिकारी गेले, तरी शिवसैनिक आणि कष्टकरी शेतकरी आजही आमच्यासोबत खंबीरपणे उभे आहेत. त्यांच्याच विश्वासाच्या जोरावर आम्ही पुन्हा नव्याने उभारी घेऊ," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिर्डीतील या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी आगामी राजकीय संघर्षाचीही दिशा स्पष्ट केली. आगामी निवडणुकांमध्ये जनतेच्या आशीर्वादाच्या जोरावर विरोधकांना उत्तर देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या भाषणादरम्यान कार्यकर्त्यांकडून घोषणाबाजी करण्यात आली आणि सभास्थळी उत्साही वातावरण निर्माण झाले.

### शिंदे गटाने अमित शाह यांनाच पाठिंबा द्यावा

लाखो शिवसैनिकांच्या त्यागातून उभी राहिलेली चळवळ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाजप आणि शिंदे गटावर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, उद्या पंतप्रधानपदाच्या निवडीची वेळ आली, तर शिंदे गटाने अमित शाह यांनाच पाठिंबा द्यावा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपला नऊ खासदार निवडून आले, तर शिंदे गटाकडे आता तेरा खासदार असल्याचा उल्लेख करत त्यांनी सध्याच्या राजकीय समीकरणांवर उपरोधिक भाष्य केले.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# भुसावळात मंदिरातील पुजाऱ्याची निर्घृण हत्या

## डोक्यात टणक वस्तूने वार करून खून



**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ | प्रतिनिधी:** भुसावळ शहराजवळील झेडटीआरआय बोगद्यालगत असलेल्या मंदिरातील ५५ वर्षीय पुजाऱ्याची डोक्यात टणक वस्तूने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे भुसावळ शहरासह संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. मृत पुजाऱ्याचे नाव संतोष रघुवीर मंचल (वय ५५, रा. झेडटीआरआय परिसर, भुसावळ) असे आहे. ते शहरातील आरपीडी रस्त्यावरील लष्करी डेपोपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या तीन मंदिरांमध्ये पूजारी म्हणून सेवा बजावत होते. संबंधित मंदिर परिसर निर्जन असल्याने तेथे नागरिकांची वर्दळ अत्यंत कमी असते. सोमवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास संतोष मंचल यांच्या कुटुंबीयांनी मंदिरात जाऊन पाहिले असता त्यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. डोक्यावर गंभीर स्वरूपाच्या जखमा असल्याचे प्राथमिक पाहणीत आढळून आले. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि परिसराची पाहणी करून पंचनामा सुरू केला. फॉरेन्सिक पथकालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. घटनास्थळावरील रक्ताचे नमुने, इतर भौतिक पुरावे तसेच हत्येसाठी वापरण्यात आलेल्या संशयित वस्तूचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. पोलिसांनी परिसर सील करून तपासाची दिशा निश्चित करण्यासाठी विविध पुरावे संकलित केले आहेत.

# राज्यात ३ ते ७ जुलैदरम्यान अतिवृष्टीचा इशारा; पंजाबराव डख यांचा अंदाज

## पुणे, मुंबई, नाशिक, धुळे, जळगावसह अनेक जिल्ह्यांत मुसळधार पावसाची शक्यता

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यात मान्सूनने अखेर दमदार हजेरी लावल्यानंतर आता पुढील काही दिवस पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी ३ जुलै ते ७ जुलै या कालावधीत राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टी होण्याचा अंदाज वर्तवला असून नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले आहे. त्याचवेळी भारतीय हवामान विभागाने (IMD) देखील राज्यात पुढील काही दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. पंजाबराव डख यांच्या अंदाजानुसार, पुणे, मुंबई, अकोला, अहिल्यानगर, नांदेड, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये ३ ते ७ जुलैदरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.



त्यामुळे नदी-नाले, ओढे आणि धरणांच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी विशेष सतर्क राहण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. डख यांच्या मते, ३ जुलैपूर्वी राज्यातील बहुतांश भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. मात्र त्यानंतर वातावरणात मोठा बदल होऊन मान्सून अधिक सक्रिय होणार असून अनेक भागांत जोरदार पावसाची शक्यता आहे. त्यांनी यंदाच्या परतीच्या पावसाबाबतही सकारात्मक अंदाज व्यक्त करत राज्यात समाधानकारक पाऊस होईल, असे म्हटले आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसारही पुढील काही दिवस राज्यात पावसाचा जोर वाढणार आहे. नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने विशेषतः विदर्भात ३ ते ७ जुलै या कालावधीत मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. तर त्याआधी दोन ते तीन दिवस हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यंदा जून महिन्यात राज्यात अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्याने अनेक भागांत पावसाची मोठी तूट निर्माण झाली आहे. विशेषतः विदर्भात सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पावसाची तूट नोंदविण्यात आली आहे. त्यामुळे खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून राज्यभर सुरू झालेल्या दमदार पावसामुळे पेरण्यांना वेग आला असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तज्ज्ञांच्या मते, पुढील काही दिवस मुसळधार पावसाची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी शेतीची कामे, नागरिकांनी प्रवास आणि प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवणे आवश्यक आहे.

# एसटीच्या उत्पन्नवाढीसाठी अधिकाऱ्यांना महिनाभराची मुदत; अपयश आल्यास बदली

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना कठोर इशारा दिला आहे. एसटीच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ करण्यात सातत्याने अपयशी ठरणाऱ्या अधिकाऱ्यांना एक महिन्याची मुदत देण्यात आली असून, या कालावधीत ठोस सुधारणा न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर बदली, पदावनती किंवा निलंबनासारखी कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंबई सेंट्रल येथील महाराष्ट्र वाहतूक भवनात सोमवारी एसटी महामंडळाच्या आर्थिक उत्पन्नवाढीचा आढावा घेण्यासाठी बैठक पार पडली. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांना उद्देशून मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या मान्य करून मोठा दिलासा दिला आहे. आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून उत्पन्न वाढविण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करणे आवश्यक आहे. केवळ बैठका घेणे आणि कागदी घोडे नाचविण्याऐवजी प्रत्यक्ष निकाल दिसला पाहिजे, असे त्यांनी बजावले. बैठकीत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, एप्रिल आणि मे या महसुलाच्या दृष्टीने महत्त्वाच्या महिन्यांमध्ये भाडेवाढ होऊनही एसटी महामंडळाला अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. उलट राज्यातील ३१ पैकी तब्बल २१ विभाग तोट्यात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महामंडळाच्या व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची नाराजीही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केली. "एसटीची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी आता अधिकारी वर्गाने निकाल दाखवून देण्याची वेळ आली आहे. काम करणाऱ्यांना शासनाचे पूर्ण पाठबळ राहील; मात्र अकार्यक्षमता, निष्क्रियता आणि उदासीनता कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. एका महिन्यानंतर प्रत्येक अधिकाऱ्याच्या कामगिरीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार बदली, पदावनती किंवा निलंबनासारखे निर्णय घेतले जातील," असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

# शेतांमधील बोअरवेल केबल चोरी करणाऱ्या दोघे जेरबंद!

## सुझुकी ॲक्सेससह चोरीचा ऐवज हस्तगत



**जन सम्राट टाईम्स**

**शिंदखेडा | प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या बोअरवेलमधील केबल आणि वीजतार चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी शिंदखेडा पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत दोन सराईत चोरट्यांना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीतील एकूण १ लाख २९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली सुझुकी ॲक्सेस १२५ दुचाकी जप्त करण्यात आली आहे. या कारवाईमुळे बोअरवेल केबल आणि वीजतार चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले असून, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ जून २०२६ रोजी सायंकाळी दलावाडे (ता. शिंदखेडा) शिवारातील शेतातून बोअरवेलची केबल कापून चोरी करत असताना मयुर भिला धनगर (वय २४, रा. वाल्मिक नगर, शिरपूर) आणि राहुल संजय पारधी (वय २०, रा. शिरपूर) हे दोघे फिर्यादीच्या निदर्शनास आले. यानंतर फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून शिंदखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक १४९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर शिंदखेडा पोलिस ठाण्याचे नवनियुक्त प्रभारी अधिकारी सपोनि मयुर भामरे यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेत मागील वर्षभरातील वीजतार आणि बोअरवेल केबल चोरीच्या घटनांचा आढावा घेतला. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने त्यांनी तपासाची सूत्रे स्वतःकडे घेत आरोपींची कसून चौकशी केली.

सखोल चौकशीदरम्यान दोन्ही आरोपींनी यापूर्वीही शिंदखेडा परिसरातील दोन वेगवेगळ्या शेतांमधून वीजतार आणि बोअरवेलच्या केबल चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींच्या कबुलीजबाबानुसार पोलिसांनी गुन्ह्यात वापरण्यात आलेली सुझुकी ॲक्सेस १२५ दुचाकी आणि चोरी केलेला एकूण १ लाख २९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या कारवाईमुळे केवळ सध्याचा गुन्हाच उघडकीस आला नसून, परिसरातील आणखी दोन चोरीच्या घटनांचाही उलगडा झाला आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, अशा गुन्ह्यांवर प्रभावी अंकुश बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत प्रभारी अधिकारी सपोनि मयुर भामरे, मपोउनि माया राजपूत, श्रेणी पोउनि गुलाब ठाकरे तसेच पोलिस अंमलदार हेमंत फुलपगारे, गणेश सोनवणे, अकील पठाण, प्रशांत पवार, रुपेश चौधरी, पुनमचंद कोळी आदींनी सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी बजावली.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाला 27 आमदारांचा विरोध

## दोन मंत्र्यांसह आमदारांची भूमिका स्पष्ट; सर्व घटकांना विश्वासात घ्या'ची मागणी

**जन सम्राट टाईम्स**



**नागपूर | प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या शासकीय हालचालींना आता राजकीय पातळीवरही विरोध होऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर दोन मंत्र्यांसह २७ आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत उपवर्गीकरणाला विरोध दर्शविणारे स्वाक्षरीयुक्त निवेदन सादर केले. संबंधित अहवाल सार्वजनिक न करता त्यावर सूचना आणि हरकती मागविण्याच्या प्रक्रियेवरही आमदारांनी आक्षेप नोंदविला आहे. राज्य शासनाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती केली होती. या समितीने आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला आहे. मात्र हा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नसताना शासनाने त्यावर नागरिक, सामाजिक संघटना आणि विविध घटकांकडून सूचना व हरकती मागविल्या आहेत. या प्रक्रियेवर आमदारांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात अहवाल सार्वजनिक करून त्यावरील चर्चा पारदर्शक पद्धतीने व्हावी, तसेच अनुसूचित जातीतील सर्व समाजघटकांना विश्वासात घेऊनच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. घाईघाईने कोणताही निर्णय घेऊ नये, अशी भूमिकाही आमदारांनी मांडल्याचे समजते. उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यात विविध समाजघटकांमध्ये मतभेद दिसून येत आहेत. मातंग समाजाकडून अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याची जोरदार मागणी केली जात असून, त्यातून आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत अधिक समतोलपणे पोहोचेल, असा दावा केला जात आहे. दुसरीकडे, महार आणि चर्मकार समाजातील अनेक संघटनांनी उपवर्गीकरणाला विरोध दर्शविला आहे. या निर्णयामुळे विद्यमान आरक्षण व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो आणि अनुसूचित जातींमध्ये नवीन वाद निर्माण होण्याची शक्यता असल्याची भूमिका या समाजघटकांनी मांडली आहे. दरम्यान, शासनाकडे उपवर्गीकरणाबाबत ५० हजारांहून अधिक सूचना आणि हरकती प्राप्त झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे हा विषय सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या अधिक संवेदनशील बनला असून, शासन पुढे कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा निर्णय हा राज्यातील लाखो नागरिकांवर परिणाम करणारा असल्याने तो सर्व संबंधित घटकांशी सखोल चर्चा करून आणि व्यापक सहमतीनेच घेतला जावा, अशी मागणी विविध स्तरातून जोर धरत आहे.

### आमदारांनी उपस्थित केले प्रश्नचिन्ह

राज्य शासनाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती केली होती. या समितीने आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला आहे. मात्र हा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नसताना शासनाने त्यावर नागरिक, सामाजिक संघटना आणि विविध घटकांकडून सूचना व हरकती मागविल्या आहेत. या प्रक्रियेवर आमदारांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# धरणे आंदोलनातील वक्तव्य भोवले!

## BNS कलम 352 व 356(3) अंतर्गत अदखलपात्र गुन्हा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** जळगावच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारी घटना समोर आली असून, शिवसेना (शिंदे गट)चे नेते तथा माजी खासदार उन्मेष पाटील यांच्याविरुद्ध पोलिस अधिकाऱ्याला उद्देशून शिवीगाळ आणि बदनामीकारक वक्तव्य केल्याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चाळीसगाव शहर पोलिस ठाण्यासमोर सुरू असलेल्या धरणे आंदोलनादरम्यान केलेल्या भाषणामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ जून रोजी आंदोलनादरम्यान उन्मेष पाटील यांनी पोलिस उपनिरीक्षक संदीप घुले यांच्यावर गंभीर आरोप करताना आक्षेपार्ह आणि शिवीगाळयुक्त भाषा वापरल्याचा आरोप आहे. आपल्या भाषणात त्यांनी पीएसआय घुले हे तरुणांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना त्रास देत असल्याचा दावा केला. याचबरोबर एका महिला पोलिस कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी केल्याचाही आरोप त्यांनी जाहीरपणे केला. या वक्तव्यांनंतर चाळीसगाव शहर पोलिस ठाण्याच्या गोपनीय शाखेतील एका पोलिस कर्मचाऱ्याने तक्रार दाखल केली. त्या तक्रारीच्या आधारे NC क्रमांक 613/26 अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 352 आणि 356(3) अंतर्गत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या कारवाईची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली. दरम्यान, आंदोलनादरम्यान केलेल्या भाषणात वापरण्यात आलेल्या शब्दांमुळे आणि पोलिस अधिकाऱ्यावर करण्यात आलेल्या आरोपांमुळे या प्रकरणाने राजकीय स्वरूप धारण केले आहे. माजी खासदार



उन्मेष पाटील यांनी केलेले आरोप आणि त्यानंतर त्यांच्याविरोधात झालेली गुन्हा नोंद यामुळे जळगाव जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मात्र, महिला पोलिस कर्मचाऱ्याबाबत करण्यात आलेल्या आरोपांबाबत पोलिसांकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. संबंधित आरोपांची सत्यता तपासानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले आहे. या प्रकरणामुळे राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर विविध प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, पुढील तपासानुसार या प्रकरणात आणखी घडामोडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### आक्षेपार्ह आणि शिवीगाळयुक्त भाषा

आंदोलनादरम्यान केलेल्या भाषणात वापरण्यात आलेल्या शब्दांमुळे आणि पोलिस अधिकाऱ्यावर करण्यात आलेल्या आरोपांमुळे या प्रकरणाने राजकीय स्वरूप धारण केले आहे. आरोप आणि त्यानंतर त्यांच्याविरोधात झालेली गुन्हा नोंद यामुळे जळगाव जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मात्र, महिला पोलिस कर्मचाऱ्याबाबत करण्यात आलेल्या आरोपांबाबत पोलिसांकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. संबंधित आरोपांची सत्यता तपासानंतरच स्पष्ट होणार असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले आहे.

### तरुणांवर खोटे गुन्हे दाखल

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ जून रोजी आंदोलनादरम्यान उन्मेष पाटील यांनी पोलिस उपनिरीक्षक संदीप घुले यांच्यावर गंभीर आरोप करताना आक्षेपार्ह आणि शिवीगाळयुक्त भाषा वापरल्याचा आरोप आहे. आपल्या भाषणात त्यांनी पीएसआय घुले हे तरुणांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना त्रास देत असल्याचा दावा केला. याचबरोबर एका महिला पोलिस कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी केल्याचाही आरोप त्यांनी जाहीरपणे केला.

# गावठी कट्ट्यासह २४ वर्षीय तरुण जेरबंद!

## एमआयडीसी पोलिसांची धडक कारवाई

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव एमआयडीसी पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे केलेल्या धडक कारवाईत गावठी कट्ट्यासह एका २४ वर्षीय तरुणाला अटक केली. आरोपीकडून मॅगझीनसह सुमारे २० हजार रुपये किंमतीचा गावठी कट्टा जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके यांना २८ जून रोजी गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती. जळगाव विमानतळासमोरील कुसुंबा परिसरातून धानवडकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर एक




तरुण गावठी कट्टा बाळगून फिरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाईची तयारी केली. मिळालेल्या माहितीची खातरजमा करून पोलिसांच्या पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचला. संशयित व्यक्तीची झडती घेतली असता त्याच्याकडे मॅगझीनसह गावठी कट्टा आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष शस्त्र जप्त करून आरोपीला ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव गणेश श्रावण सोनवणे (वय २४, रा. कुसुंबा, जळगाव) असे असून त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या गावठी कट्ट्याची अंदाजे किंमत २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीकडे हे बेकायदेशीर शस्त्र कुठून आले, त्याचा वापर कोणत्या उद्देशाने केला जाणार होता तसेच यामागे आणखी कोणाचे नेटवर्क आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत. जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांवर भविष्यातही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# इलेक्ट्रिक कार घेऊन जाणाऱ्या कंटेनरला आग!

## आगीचे कारण अद्याप अस्पष्ट



जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** चेन्नईहून गुजरातच्या दिशेने लक्झरी इलेक्ट्रिक कार घेऊन जाणाऱ्या कंटेनरला साक्री तालुक्यातील सुरपन गाव फाट्याजवळ अचानक आग लागल्याची घटना घडली. चालकाच्या सतर्कतेमुळे आणि साक्री अग्निशामक दलाच्या तत्पर कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, KL-01-AF-2477 क्रमांकाचा कंटेनर चेन्नईहून गुजरातच्या दिशेने पाच लक्झरी इलेक्ट्रिक कार घेऊन जात होता. या वाहनातील कारांची एकूण किंमत सुमारे तीन कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. दुपारच्या सुमारास कंटेनरमधून धूर निघत असल्याचे चालकाच्या निदर्शनास आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालकाने तात्काळ वाहन थांबवत साक्री अग्निशामक दलाला माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशामक दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी तातडीने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. त्यामुळे आग अधिक भडकण्यापासून रोखण्यात यश आले आणि मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच साक्री पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच परिसरातील नागरिकांनीही मोठी गर्दी केली होती. आगीमुळे कंटेनरसह त्यामधील पाचही इलेक्ट्रिक कारांचे नुकसान झाले असून नुकसानीचा नेमका आकडा अद्याप समोर आलेला नाही. दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून साक्री पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

### वाहनांच्या लांब रांगा

या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, KL-01-AF-2477 क्रमांकाचा कंटेनर चेन्नईहून गुजरातच्या दिशेने पाच लक्झरी इलेक्ट्रिक कार घेऊन जात होता. दुपारच्या सुमारास कंटेनरमधून धूर निघत असल्याचे चालकाच्या निदर्शनास आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालकाने तात्काळ वाहन थांबवत साक्री अग्निशामक दलाला माहिती दिली.

# धुळ्यात तृतीयपंथीयांकडून वटसावित्री पौर्णिमा उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** : वटसावित्री पौर्णिमेनिमित्त धुळे शहरात तृतीयपंथीय समाजाने अनोख्या पद्धतीने वडाच्या झाडाची पूजा करून आपल्या गुरुच्या दीर्घायुष्याची प्रार्थना केली. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या तृतीयपंथीयांनी वडाच्या झाडाला फेऱ्या मारत श्रद्धाभावाने पूजा केली. यावेळी काळेश्वरी देवीला आंब्यांची आकर्षक आरासही करण्यात आली होती. वटसावित्री पौर्णिमेनिमित्त विवाहित महिला आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाची पूजा करतात. मात्र धुळ्यात तृतीयपंथीय समाजाने आपल्या गुरुचे आयुष्य निरोगी आणि दीर्घ व्हावे, तसेच सातही जन्मी हाच गुरु लाभावा, अशी प्रार्थना करत वटसावित्रीचे व्रत साजरे केले. त्यांच्या या अनोख्या परंपरेची शहरात सर्वत्र चर्चा रंगली.



या धार्मिक विधीद्वारे गुरु-शिष्य नात्यातील श्रद्धा, निष्ठा आणि परंपरेचे महत्त्व अधोरेखित झाल्याचे उपस्थितांनी सांगितले. या पूजेमुळे वटसावित्री पौर्णिमेच्या उत्सवाला वेगळे सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूप लाभले. यावेळी नीलू पार्वती जोगी, स्वरा पार्वती जोगी, अलका पार्वती जोगी, साक्षी जोगी, शुभांगी जोगी, जान्हवी जोगी, राधा जोगी, बबीता जोगी, लकी जोगी, माही जोगी, आरु जोगी, रोहिणी जोगी, राशी जोगी, दीपा जोगी आदी तृतीयपंथीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गायत्री मोरे राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या नाशिक शहर युवती आघाडीच्या अध्यक्षपदी!

## राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे यांच्या हस्ते नियुक्ती

जन सम्राट टाईम्स

**नाशिक (प्रतिनिधी):** मराठी दूरचित्रवाणी मालिकांमधील लोकप्रिय अभिनेत्री गायत्री मोरे यांची राष्ट्रीय रिपब्लिकन पक्षाच्या नाशिक शहर युवती आघाडी (सांस्कृतिक विभाग) अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब कटारे यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. राष्ट्रीय रिपब्लिकन पक्ष राज्यभरात रिपब्लिकन चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी विविध स्तरांवर संघटनात्मक बांधणी करत असून, त्याचाच एक भाग म्हणून नाशिक शहरात पक्षप्रवेश आणि संघटन विस्ताराला गती देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर गायत्री



मोरे यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. गायत्री मोरे यांनी अनेक मराठी दूरचित्रवाणी मालिकांमध्ये उल्लेखनीय भूमिका साकारल्या असून, सध्या त्या स्टार प्रवाह वाहिनीवरील मालिकेतही कार्यरत आहेत.

युवा आणि युवतींमध्ये त्यांचा मोठा जनसंपर्क असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली नाशिक शहरात युवती आघाडी अधिक सक्षमपणे उभी राहील, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे.

नियुक्तीनंतर बोलताना गायत्री मोरे यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीबद्दल आभार व्यक्त केले. नाशिक शहरातील युवक-युवतींना मोठ्या प्रमाणात पक्षाशी जोडून संघटना मजबूत करण्यासाठी कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच लवकरच 'युवा जोडो' अभियानाची सुरुवात करून शहरातील युवक-युवतींचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी खंबीरपणे काम करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. यावेळी महाराष्ट्र राज्य युवा नेतृत्व बिपीन कटारे, नाशिक युवा जिल्हाध्यक्ष जितू भाऊ बागुल, सातपूर महिला अध्यक्षा मायाताई कांबळे, नितीन बोबडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. गायत्री मोरे यांच्या निवडीमुळे त्यांच्या समर्थक आणि नाशिकमधील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.


### आभार व्यक्त केले

युवा आणि युवतींमध्ये त्यांचा मोठा जनसंपर्क असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली नाशिक शहरात युवती आघाडी अधिक सक्षमपणे उभी राहील, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. नियुक्तीनंतर बोलताना गायत्री मोरे यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीबद्दल आभार व्यक्त केले.

# साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवरील अत्याचार व हत्येप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे दोषी!

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी :** संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवरील अत्याचार आणि निर्घृण हत्येप्रकरणी विशेष न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपीविरुद्ध दाखल करण्यात आलेले सर्व सातही गुन्हे सिद्ध झाल्याचे नमूद करत हा गुन्हा 'दुर्मीळातील दुर्मीळ' स्वरूपाचा असल्याचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने तब्बल १३७ पानी निकालपत्रात नमूद केले आहे



की, दोन्ही पक्षांचा युक्तिवाद, साक्षीदारांचे जबाब, वैज्ञानिक पुरावे आणि तपासातील सर्व बाबींचा सखोल विचार केल्यानंतर आरोपी दोषी असल्याचे निर्विवादपणे सिद्ध झाले. पीडितेवर अत्यंत अमानुष अत्याचार करून तिची क्रूरपणे हत्या करण्यात आली. त्यामुळे संविधान आणि विद्यमान कायद्याच्या चौकटीत राहून आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा देणेच न्यायसंगत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. निकालात यापूर्वीच्या लैंगिक अत्याचार व हत्येच्या प्रकरणांतील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचाही संदर्भ देण्यात आला आहे. गुन्ह्याचे भीषण स्वरूप, पीडितेचे अल्पवय आणि आरोपीने दाखवलेली क्रूरता लक्षात घेता मृत्युदंडाशिवाय अन्य कोणतीही शिक्षा पुरेशी ठरणार नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे १ मे, महाराष्ट्र दिनी साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर या प्रकरणाचा फास्ट ट्रॅक न्यायालयात वेगाने खटला चालविण्यात आला. विशेष म्हणजे, अवघ्या दोन महिन्यांत या प्रकरणाचा निकाल लागला असून, राज्यातील सर्वात जलदगतीने निकाल लागलेल्या गंभीर गुन्ह्यांपैकी हा एक महत्त्वाचा खटला ठरला आहे. या निर्णयामुळे पीडित कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत असून, समाजातही या निकालाचे स्वागत होत आहे.

# अपयश सहा लढायांनंतर विजयाची सलामी!

## वरुण महेश पाटील यांचा प्रेरणादायी प्रवास

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील सारवे या छोट्याशा गावातून सुरू झालेला एक प्रवास आज भारतीय सैन्यात लेफ्टनंट म्हणून देशसेवेच्या अभिमानास्पद स्थानापर्यंत पोहोचला आहे. हा प्रवास केवळ एका व्यक्तीच्या यशाचा नाही, तर कुटुंबाच्या त्यागाचा, नात्यांच्या आधाराचा, चिकाटीचा आणि कधीही हार न मानणाऱ्या जिद्दीचा आहे. लेफ्टनंट वरुण महेश पाटील यांचा जन्म एका साध्या कुटुंबात झाला. वडील महेश शामराव पाटील हे जळगाव येथील एसटी वर्कशॉप येथे कार्यरत असून आई विद्या महेश पाटील या गृहिणी आहेत. कुटुंबातील संस्कार, प्रामाणिकपणा आणि मेहनतीची शिकवण त्यांना लहानपणापासूनच मिळाली. मात्र वरुण यांचे बालपण वेगळे ठरले. शिक्षण आणि उज्ज्वल भविष्यासाठी ते लहानपणापासूनच काका सुभाष शामराव पाटील आणि काकू डॉ. वैशाली सुभाष पाटील यांच्याकडे राहिले. काका पाटबंधारे विभागात वर्ग-२ अधिकारी म्हणून कार्यरत असून काकू शिक्षिका आहेत. दोघांनीही वरुण यांच्या शिक्षणासाठी, स्वप्नांसाठी आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी मोलाचा वाटा उचलला. त्यांच्या विश्वासामुळेच वरुण यांची वाटचाल अधिक सक्षम झाली. घरातील प्रत्येक व्यक्तीने त्यांना नेहमीच बळ दिले. भाऊ निशांत महेश पाटील(LLB शिक्षण घेत आहे )भाऊ साहिल सुभाष पाटील (AFPI मध्ये NDA ची तयारी) भाऊ प्रतिक प्रकाश पाटील( MPSC करत आहे)आणि बहीण अलिशा सुभाष पाटील (BAMS शिक्षण) यांचाही प्रेरणादायी सहवास लाभला. वरुण यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पी.जी. पब्लिक स्कूल नंदुरबार येथे झाले. त्यानंतर एसपीआय, संभाजीनगर (औरंगाबाद) येथे बारावीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, नाशिक येथून त्यांनी सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली. लहानपणापासून भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न त्यांच्या डोळ्यांत होते. मात्र हे स्वप्न सहज पूर्ण झाले नाही. सलग प्रयत्न, अपयश, मानसिक ताण आणि अनेकदा स्वतःवरच प्रश्न निर्माण होणारे दिवस त्यांच्या आयुष्यात आले. एकदा-दोनदा नव्हे, तर सहा वेळा SSB मुलाखतीला सामोरे जावे लागले. प्रत्येक अपयश मनाला वेदना देणारे होते. अनेकांनी पर्यायी करिअरचा सल्ला दिला, वर्दी घालायचीच." त्या काळात त्यांनी स्वतःला पुन्हा उभे केले. स्वतःतील कमतरता शोधल्या, त्यावर काम केले आणि नव्या जोमाने तयारी सुरू केली. अभ्यास, शारीरिक तंदुरुस्ती, व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मविश्वास यासाठी त्यांनी दिवस-रात्र मेहनत घेतली. परीक्षांच्या काळात अनेकदा अवघ्या चार तासांच्या झोपेवर त्यांनी अभ्यास आणि सराव सुरू ठेवला. प्रत्येक दिवस स्वतःला कालपेक्षा अधिक सक्षम बनवण्याचा होता. अखेर त्यांच्या अथक परिश्रमाचे फळ मिळाले. त्यांना केवळ एकदाच नव्हे, तर तीन वेळा SSB Recommendation मिळाली—SSC Tech-64, TGC-141 आणि Indian Navy Pilot. हा स्वतःमध्ये अत्यंत अभिमानास्पद टप्पा होता.


जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# धुळे शहर विकासाच्या परिवर्तनाची नांदी अशीच कायम राहील : पालकमंत्री

## आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या संकल्पनेतून शहरात विकासकामांचा वेग

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** धुळे शहराला स्मार्ट, सुंदर आणि स्वच्छ बनविण्याचा संकल्प भाजप सरकारने केला असून, गेल्या दीड वर्षांत आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या संकल्पनेतून विविध विकासकामांद्वारे शहरात विकासरूपी परिवर्तन घडत आहे. ही परिवर्तनाची नांदी आगामी काळातही कायम राहील, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. माझी वसुंधरा अभियानांतर्गत आणि आमदार अनुपभैया अग्रवाल यांच्या संकल्पनेतून देवपूर येथील जीटीपी स्टॉपलगत साकारण्यात आलेल्या 'सुलेखन' व 'सरस्वती' या थीम आधारित उद्यानांचे लोकार्पण रविवारी सायंकाळी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार अनुपभैया अग्रवाल, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित



होते. कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री रावल म्हणाले की, धुळे ही जिल्ह्याची राजधानी असली तरी पूर्वीच्या काळात शहराची सातत्याने बदनामी होत होती. मात्र, जनतेने परिवर्तन घडवून आणत राज्यात आणि महापालिकेत भाजपला सत्ता दिल्यानंतर शहराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली आहे. मोठ्या शहरांच्या धर्तीवर आधुनिक उद्याने, सुशोभीकरण, स्वच्छता आणि पायाभूत सुविधांवर भर दिला जात असून धुळे शहर आता जिल्ह्यातील मॉडेल शहर म्हणून उदयास येत असल्याचे त्यांनी सांगितले. विशिष्ट संकल्पनेवर आधारित 'सुलेखन' व 'सरस्वती' ही उद्याने शहराच्या वैभवात भर घालणारी ठरतील, असा विश्वास व्यक्त करताना त्यांनी विकासकामांसाठी जनतेच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

महापालिका निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्रितपणे काम करत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आ.अनुपभैया अग्रवाल यांनी धुळे शहरातील आगामी विकास आराखड्याची माहिती देताना सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली शहराचा चेहरा-मोहरा बदलण्याचे काम सुरू आहे.

### अत्याधुनिक रुग्णालये उभारण्याचे काम सुरू

गुरुद्वारापासून नगावबारीपर्यंतच्या सात किलोमीटर मार्गावरील वीजखांब हटवून अंडरग्राउंड केबल टाकण्यात येणार असून डिव्हायडरवर आकर्षक रोषणाई केली जाईल. मोठ्या पुलावरील अतिक्रमणे हटवून पुलाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. तसेच संतकृपा अपार्टमेंटसमोर नवीन भाजी मार्केट, पंचायत समिती परिसरात दोन आधुनिक उद्याने, नगावबारी टेकडीवर ऑक्सिजन पार्क आणि महापालिकेची अत्याधुनिक रुग्णालये उभारण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306